MHOS130025592024

नि.दि.दा.क्र.८३१/२०२४
**दत्तात्रय हराळ व इतर विरुध्द**
**गोरख हराळ व इतर**

## निशानी क्र.१३ च्या अर्जावरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांच्या विरुध्द दावा 'एकतर्फा' चालविण्याचा आदेश रद्द होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे कथनानुसार, प्रतिवादी हे शेतकरी आहेत. दिनांक १३.०१.२०२५ रोजी प्रतिवादी यांना त्यांचे शेतामध्ये पेरणी व इतर मशागतीचे काम असल्यामुळे ते कोर्टात हजर राहू शकले नाहीत. सदर प्रतिवादी यांनी प्रस्तुत प्रकरणात हजर राहण्यास जाणीवपूर्वक टाळले नाही. सदर प्रतिवादी हे आज रोजी प्रस्तुत प्रकरणात हजर राहून आज रोजी आपली कैफियत दाखल करत आहेत. सबब, प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द दिनांक १३.०१.२०२५ रोजी एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत प्रकरण हे स्थावर मिळकतीचे असुन सदर प्रकरणात या प्रतिवादींचे हित संबंध गुंतलेले आहेत. सबब, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द होवून मिळण्यात यावा व त्यांची लेखी कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**०३.** वादीने प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या अर्जास जोरदार आक्षेप नोंदवून प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे अथवा मंजुर करावयाचे मतास

आल्यास सदर प्रतिवादीवर जास्तीत जास्त दंड बसवण्याची विनंती केली आहे.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दिलेले कारण पाहता ते योग्य व संयुक्तीक वाटते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ते ५ यास हजर होवून म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास दाव्यावर फारसा परिणाम होणार नाही. याउलट दावा हा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होईल. परंतू, प्रतिवादी क्र.१ ते ५ यास हजर होण्यास लागलेल्या विलंबाचा विचार करता सदर प्रतिवादीवर रक्कम रु.५००/– एकत्रीत दंड बसवून अर्ज मंजुर करणे योग्य ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **निशानी क्र.१३** वादीस **रु.५००/–(रुपये पाचशे फक्त)** एकत्रीत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे विरुध्दचा 'एकतर्फा' आदेश रद्द करण्यांत येतो व सदर प्रतिवादी यांनी अनु क्र.१ ची पुर्तता केल्यानंतर त्यांची लेखी कैफियत स्वीकारण्यात येते.

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.08 17:19:41 +0530

दिनांक : ०८.०८.२०२५

( **श्रीमती ए.एस.मते** )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

नि.दि.दा.क्र.८३१/२०२४

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | N. V. Koli<br>Stenographer Grade-III |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Jr. Dn., Bhoom. |
| Date | ... | 08.08.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 08.08.2025 |
| Order uploaded on | ... | 08.08.2025 |